सन २०१७-१८ मध्ये केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राष्ट्रीय आयुष अभियानाकरीता सामाजिक विशेष (SCSP) घटकांकरीता राज्य हिश्श्यापोटी रु. १८२.६२८ लक्ष अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः आयुष-०३१८/प्र.क्र.१३०/आ-७

१० वा मजला , गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक: ३१ मार्च, २०१८.

वाचा :-

संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांचे क्र. आसंमुं/राआअ/केपुयो/२०१७-१८/ SCSP/ राज्य हिस्सा/ वितरीत/२०१८/आयु-२/२७०८-०९, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ चे पत्र.

प्रस्तावना :-

भारत सरकारने राष्ट्रीय आयुष अभियान (National AYUSH Mission) ही केंद्र पुरस्कृत योजना सप्टेंबर, २०१४ मध्ये सुरु केलेली आहे. सदर योजनेनुसार देशातील सामान्य जनतेकरीता आयुष आरोग्य सेवा व शिक्षण उपलब्ध करणे, आयुर्वेदीक, होमिओपॅथीक व युनानी औषधांच्या दर्जात वाढ करणे व सातत्यपूर्ण गुणात्मक औषधी वनस्पती पुरवठा करणे इ. घटकांचा समावेश आहे. त्याकरीता सदर योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार संबंधित घटकांसाठी आवश्यक लागणाऱ्या निधीपैकी ६०% हिस्सा केंद्र शासनाने व ४०% हिस्सा राज्य शासनाने उपलब्ध करुन द्यावयाचा आहे.

राष्ट्रीय आयुष अभियान (National AYUSH Mission) या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राज्य हिश्श्यापोटी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी सामाजिक विशेष घटकाकरीता (SCSP) अनुदान राज्य आरोग्य सोसाटीस वितरीत करण्याकरीता पुढील प्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आयुष अभियान या केंद्र पुरस्कृत योजने करीता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी सामाजिक विशेष घटकाकरीता (SCSP) राज्य हिश्श्यापोटी रु. १८२.६२८ लक्ष (रुपये एक कोटी ब्याऐंशी लक्ष बासष्ठ हजार आठशे फक्त) इतके अनुदान सन २०१७-१८ च्या मंजूर तरतूदीतून वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त अनुदानासाठी सदर निधी राज्य आयुष सोसायटीकडे वर्ग करण्यास अनुदानाचे देयक अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्याकडे सादर करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई हे आहरण व संवितरण अधिकारी तसेच, सह संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई हे "नियंत्रक अधिकारी" अधिकारी असतील.

३. सदर राज्य हिश्श्यामधील खर्च मागणी क्र.आर-१, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य; ७८९-अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना, (०१) (०२) राष्ट्रीय आयुष अभियान (राज्य हिस्सा ४०%) २२१०F४७१ राष्ट्रीय आयुष अभियान केंद्र पुरस्कृत योजना, ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) परिशिष्ट -अ मधील सारणीतील स्तंभ क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-१८ साठी मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदरचे अनुदान सशर्त असून वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.२०१३/ प्र.क्र.८५/ २०१३/ अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल, २०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

५. वित्त विभागाच्या क्र. अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ च्या परिच्छेद ७ ते १८ व सोबतच्या परिशिष्टामधील अनु. क्र.८ मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक अटी व शर्तींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी राज्य आयुष सोसायटीमार्फत अंमलबजावणी खात्यात थेट जमा होणार आहे.

शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरील निधी राज्य आयुष सोसायटीच्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करुन खर्च करण्यात येणार आहे अस प्रमाणित करण्यात येत आहे.

६. सदर प्रस्तावावरील खर्च शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतूदीनुसार आवश्यक तेथे करावयाच्या खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी. सदर रक्कम अनुसूचित जाती / नवबौध्द घटकातील लाभार्थ्यांसाठीच खर्च करण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३३११२३४४५९५१७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amol Nilakanth Sakharkar

Digitally signed by Amol Nilakanth Sakharkar
DN: CN = Amol Nilakanth Sakharkar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture Animal Husbandry dairy and Fisheries Department
Date: 2018.03.31 16:39:36 +05'30'

(अ. नि. साखरकर)
अवर सचिव

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. संचालक आयुष, आयुष संचालनालय, मुंबई.
४. संचालक (वित्त), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई .
७. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन अर्थसंकल्प / लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग .
१०.निवडनस्ती (आरोग्य -७).